॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

संयम हेच खरे औषध.

अहिल्यानगर | बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३३० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com



निळवंडेच्या उजव्या कालव्यात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू!

पान क्र. २ वर



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे आचरण करणे गरजेचे

पान क्र. ३ वर



अतिक्रमणे व फ्लेक्स बोर्ड हटवून महापुरुषांच्या स्मारकांचे पावित्र्य जपा

पान क्र. ४ वर

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### सावट

स्वागताला उभी झाडे
बुंधेच फक्त कापलेले
सेल्शिअसमध्ये मोजू
ऊन भलतेच तापलेले

बेसुमार लुटीमुळेच
निसर्ग आहे कोपलेला
हवामानबदल कळेना
माणूस गाढ झोपलेला

## SPOT NEWS

### अशोक खरातची पुन्हा पोलिस कोठडीत रवानगी

● **नाशिक** – नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. तिस–या गुन्ह्यातील पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर, आज अशोक खरातला 'व्हीडीओ कॉन्फरन्सिंग'द्वारे नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खरातला १८ एप्रिलपर्यंत (५ दिवस) पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव अशोक खरातला आज प्रत्यक्ष न्यायालयात न आणता 'व्हीडीओ कॉन्फरन्सिंग'द्वारे हजर करण्यात आले. न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना खरातने पोलिसांनी मारहाण केली नसल्याचे स्पष्ट केले. सरकारी वकील ॲड. शैलेंद्र बागडे यांनी न्यायालयात खरातच्या गुन्ह्याची भीषणता मांडली. त्यांनी सांगितले की, आरोपी स्वत:ला देवाचा अवतार म्हणवून महिलांना जाळ्यात ओढत होता. महिलांना तांब्याच्या भांड्यातील पाणी आणि पेढा खाऊ घालायचा, ज्यात गुंगीचे औषध मिसळलेले असायचे. मी देवाचा अवतार आहे. माझ्याशी संबंध ठेवल्याने तू पवित्र झाली आहे, असे सांगून तो महिलांचे लैंगिक शोषण करायचा. गुंगीच्या औषधात नेमके काय मिसळले होते आणि या भोंदूगिरीसाठी तो कोणत्या रत्नांचा वापर करत होता, याचा शोध घेण्यासाठी ५ दिवसांच्या कोठडीची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

### भाजपचे सम्राट चौधरी बिहारचे नवे मुख्यमंत्री

● **पाटणा** – देशात ५ राज्यांतील विधानसभा निवडणुकांची लगबग सुरू असतानाच बिहारच्या राजकारणात बदलाचे वारे वाहत आहे. आता मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला त्यामुळे आता बिहारचा नवा मुख्यमंत्री कोण याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असतानाच भाजपने सम्राट चौधरी यांच्या नावाची घोषणा केली आहे. त्यामुळे आता बिहारमध्ये भाजपचा मुख्यमंत्री होणार आहे, हे स्पष्ट झाले आहे.

# होर्मुझला अमेरिकेचा वेढा!

## संघर्ष उफाळणार?, चर्चेच्या दुसऱ्या फेरीचे अमेरिकेचे संकेत

● **वॉशिंग्टन** – इराण–अमेरिकेची इस्लामाबाद येथील चर्चा फिस्कटल्यानंतर दोन दिवसांनी महत्त्वाची घटना घडली. यात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार होर्मुझ सामुद्रधुनीला वेढा घालण्यात आला. त्यामुळे पुन्हा मोठा संघर्ष उफाळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यातच आता चीननेही अमेरिकेला इशारा दिल्याने आखातातील तणाव वाढण्याची भीतीही व्यक्त होत आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी याच आठवड्यात इराणसोबत चर्चेची दुसरी फेरी होऊ शकते, असे स्पष्ट संकेत दिले आहेत. त्यामुळे आता जगाचे या शांतता चर्चेकडेही लक्ष लागले आहे.

अमेरिकेच्या सेंटकॉमने आधी होर्मुझमधून कोणतेही जहाज जाऊ दिले जाणार नाही, अशी घोषणा केली होती. मात्र नंतर इराणच्या बंदरांकडे जाणारी किंवा तेथून निघणारी जहाजे अडवली जातील, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच इराणी रिव्होल्युशनरी गार्डला २० लाख डॉलरची लाच देऊन जाणा–या जहाजांवरही कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला.



इराणचे चाबहार बंदर हे होर्मुझच्या सामुद्रधुनीचे प्रवेशद्वार मानले जाते. ओमानच्या आखातातून भारत आणि मध्य आशियातील व्यापारासाठी हे बंदर अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याखालोखाल बंदर अब्बास हीदेखील होर्मुझ मार्गावरील इराणची मुख्य चौकी आहे. याच बंदरातून होर्मुझमधल्या जहाजांच्या हालचालींवर नियंत्रण केले जाते. याखेरीज पर्शियाच्या आखातात असलेली खुमेनी, बुशहर, महशहर ही बंदरे तसेच किश आणि लावन ही पर्शियाच्या आखातातील इराणची बेटे व्यापारी दृष्टीने महत्त्वाची आहेत.

अमेरिकेच्या या कारवाईनंतर इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डने तीव्र प्रतिक्रिया दिली. इराणच्या बंदरांना धोका निर्माण झाल्यास पर्शियन आखात आणि ओमान आखातातील एकही बंदर सुरक्षित राहणार नाही, असा इशारा देण्यात आला. अमेरिकेच्या नौदलाने आक्रमक कारवाई केली तर आखातातील सर्वच्या सर्व बंदरे उडवून देण्याची धमकी इराणने दिली.

### अमेरिका-इराणची चर्चेची दुसरी फेरी?

अमेरिका आणि इराण यांच्यात पाकिस्तानमध्ये झालेल्या शांतता चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरल्यानंतर आता जगाचे लक्ष या चर्चेच्या दुसऱ्या फेरीकडे लागले आहे. अमेरिका–इराण यांच्यात २ आठवड्यांचा युद्धविराम घोषित केल्यानंतर इस्लामाबाद येथे चर्चेचे आयोजन केले होते. ११ एप्रिल रोजी यावर ठोस तोडगा निघाला नाही. त्यामुळे अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी केली आहे. आता या देशांमध्ये चर्चेची दुसरी फेरी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे युद्धावर तोडगा निघणार का, याकडे साऱ्या जगाचे लक्ष असणार आहे.

## बनाईदेवी यात्रेत तमाशा कलावंतांवर हल्ला; गुन्हा दाखल

### महिला कलाकारांवरही अत्याचार

● **पारनेर । वीरभूमी**– तालुक्यातील वडगाव सावताळ येथे बनाईदेवी यात्रोत्सवानिमित्त आयोजित तमाशा कार्यक्रमादरम्यान तळीरामांकडून कलावंतांवर मारहाण केल्याची धक्कादायक घटना रविवारी रात्री घडली. या प्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात प्रमुख तिघांसह ४ ते ५ अनोळखी जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दिपाली आनंदा भोसले (वय ३०, रा. विडने, ता. फलटण, जि. सातारा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार रविंद्र भाऊसाहेब शिंदे, अमोल नामदेव शिंदे, बाळू छबन बर्डे (रा. वडगाव सावताळ, ता. पारनेर) यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, यात्रा समितीच्या निमंत्रणावरून १२ एप्रिल रोजी तमाशा पथक वडगाव सावताळ येथे दाखल झाले होते. रात्री सुमारे १० वाजता एक व्यक्ती मद्यधुंद अवस्थेत स्टेजजवळ येऊन कार्यक्रम कधी सुरू होणार याची विचारणा करत होता. काही वेळातच तो ७ ते ८ जणांसह परत येत कार्यक्रम बंद करण्याची मागणी करत शिवीगाळ, दमदाटी व धक्काबुक्की करू लागला. वाद वाढताच संबंधितांनी कलाकारांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या गणेश अष्टीकर भोसले यांना लोखंडी खुंट्याने मारहाण करण्यात आली. तसेच महिला कलाकार गीतांजली भोसले व राजश्री तांबे यांचे कपडे फाडण्यात आले. याशिवाय तमाशातील ऑर्गन, ढोलकी, कच्ची ढोल, माईक, मिक्सर, लाईट व साऊंड बॉक्सची तोडफोड करून सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच गावकरी व पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मात्र, त्याआधीच हल्लेखोरांनी पळ काढला. या प्रकारामुळे तमाशा कलावंतांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अखेर कार्यक्रम रद्द करण्यात आला. दरम्यान, या गंभीर घटनेची सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी तातडीने दखल घेतली आहे. त्यांनी पोलिस निरीक्षक संतोष खेडकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून संबंधितांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्याची माहिती आहे.

## मोदी-ट्रम्प यांच्यात ४० मिनिटे चर्चा

### होर्मुझवरुन इराणसोबत तणाव वाढला

● **नवी दिल्ली । वीरभूमी**– इस्लामाबादमधील इराण आणि अमेरिका यांच्यातील चर्चा फिस्कटल्यानंतर आखाती देशांमध्ये तणाव वाढला आहे. अमेरिकेने थेट इराणच्या बंदरांचीच नाकेबंदी सुरू केली. तर आता इराणही आक्रमक पवित्र्यात आहे. अशातच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात चर्चा झाली. ४० मिनिटे दोन्ही नेत्यांनी युद्ध परिस्थितीवर चर्चा केल्याची माहिती सूत्रांनी दिली.



इराण आणि अमेरिकेमध्ये शस्त्रसंधी झाल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत पंतप्रधान मोदी यांची पहिलीच चर्चा झाली. अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीची पूर्णपणे नाकेबंदी करण्याची घोषणा केल्यानंतर ही घडामोड घडली आहे. अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिओ गोर यांनी सांगितले की, अध्यक्ष ट्रम्प पंतप्रधान मोदींना म्हणाले की, भारत अमेरिकेचा प्रिय मित्र आहे. द्विपक्षीय सहकार्यावर वाढवण्यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला. त्याचबरोबर पश्चिम आशियामध्ये जी परिस्थिती उद्भवली आहे, त्यावरही चर्चा झाली. होर्मुझ सामुद्रधुनी खुली असावी आणि त्यातून जहाजांना सुरक्षितपणे वाहतूक करता यायला हवी, या मुद्यावर मोदींनी भर दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही याबद्दल एक्सवर माहिती दिली. मोदी म्हणाले, माझे मित्र राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा मला कॉल आला होता. आम्ही दोन्ही देशांच्या सहकार्याने सुरू असलेल्या विविध क्षेत्रातील कामांचा आढावा घेतला. आम्ही सर्व क्षेत्रांमध्ये व्यापक जागतिक सहकार्य वाढवण्यावर जोर दिला. आम्ही पश्चिम आशियामधील परिस्थितीवरही चर्चा केली आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित असायला हवी, यावर जोर दिला.

## नाशिकमध्ये शिवसेना नेत्यावर कोयत्याने हल्ला

### घटनेचा व्हीडीओ व्हायरल । हल्ला का केला याबाबत पोलिसांचा तपास सुरु

● **नाशिक । वीरभूमी**– नाशिकमध्ये पुन्हा एकदा गुन्हेगारीच्या घटनांनी डोके वर काढले आहे. शहरातील सिडको परिसरात सोमवारी रात्री उशिरा एक धक्कादायक घटना घडली. शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे विभागप्रमुख सुयश पाटील यांच्यावर ६ ते ७ जणांच्या टोळक्याने कोयत्याने सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात पाटील गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुयश पाटील यांच्यावर हल्ला झाल्याचा धक्कादायक व्हीडीओ समोर आला आहे. पाटील यांच्यावर हल्ला का केला? याचा तपास नाशिक पोलिस करत आहे.



नाशिकमधील सिडकोतील दत्त चौक परिसरात सुयश पाटील यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना घडली. रात्री उशिरा सुयश पाटील सिडको परिसरात होते. त्याचवेळी अचानक आलेल्या सहा ते सात जणांच्या टोळक्याने पाटील यांच्यावर धारदार कोयत्याने सपासप वार केले. सुयश पाटील यांना रक्ताच्या थारोळ्यात पाडल्यानंतर हल्लेखोरांनी त्यांच्या कार्यालयाचीही मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली आणि तिथून पळ काढला. या घटनेचा व्हीडीओ समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आणि दहशतीचे वातावरण पसरले.

नाशिकमधील स्थानिक सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुयश पाटील यांच्यावर झालेला हा हल्ला जुन्या भांडणाच्या कुरापतीतून झाला असेल असा संशय व्यक्त केला जात आहे. पाटील यांच्यावर हल्ला करण्यासाठी टोळके पूर्ण तयारीनिशी आले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, त्यामध्ये तीन हल्लेखोर स्पष्टपणे कैद झाले आहेत. या फुटेजच्या आधारे पोलिसांनी आरोपींची ओळख पटवण्यास सुरुवात केली आहे.

सुयश पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्या प्रकरणी नाशिकमधील अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे. आरोपींना पकडण्यासाठी नाशिक पोलिसांनी विविध पथके तयार केली आहेत. गर्दीच्या ठिकाणी एखाद्या राजकीय पदाधिका–यावर झालेल्या या हल्ल्यामुळे नाशिकच्या कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह पुन्हा एकदा उपस्थित केले जात आहे.

सहा ते सात जणांच्या प्राणघातक हल्ल्यात शिंदे गटाचे पदाधिकारी सुयश पाटील गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. सध्या सुयश पाटील यांची प्रकृती चिंताजनक आहे, त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. सुयश पाटील यांच्यावर हल्ला झाल्यानंतर स्थानिक शिवसेना कार्यकर्त्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. तर पाटील यांचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी अंबड पोलिसांनी परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.

# नोकरीच्या आमिषाने दाम्पत्याची १३.५० लाखांची फसवणूक

## बनावट नियुक्ती आदेश देऊन विश्वास संपादन । पाथर्डीत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

● **पाथर्डी । वीरभूमी**– शिक्षक म्हणून नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत दाम्पत्याची तब्बल १३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पाथर्डीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रुपेशकुमार राम बागडे (वय ३९, रा. शिक्षक कॉलनी, पाथर्डी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, त्यांचा भाऊ किरण बागडे याचा मित्र सुभाष माणिक खेडकर (रा. मालेवाडी, ता. पाथर्डी; सध्या पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर) याने सन २०२२ मध्ये त्यांच्याशी संपर्क साधून जालना येथील विद्यालयाशी संलग्न असलेल्या सांची प्राथमिक विद्यालय, चेतनानगर येथे शिक्षक पदाच्या जागा असल्याचे सांगितले.

या जागांवर नियुक्ती करून देण्यासाठी प्रत्येकी १५ लाख रुपये, अशा एकूण ३० लाख रुपयांची मागणी करण्यात आली. त्यानंतर खेडकर याने संस्थाचालक लिंबराज रामचंद्र जाधव (रा. छत्रपती संभाजीनगर) यांच्याशी भेट घडवून आणली. दोघांनी मिळून नोकरी निश्चित असल्याचे सांगत फिर्यादींचा विश्वास संपादन केला.

यानंतर रुपेशकुमार राम बागडे यांनी वेळोवेळी रोख, आरटीजीएस व ऑनलाईन व्यवहाराद्वारे एकूण १८ लाख ५० हजार रुपये दिले. तसेच दोघांना बनावट नियुक्ती आदेश देण्यात आले. त्या आधारे रुपेशकुमार बागडे व त्यांच्या पत्नीने काहीकाळ शाळेत कामही केले. मात्र, त्यांना कोणताही पगार मिळाला नाही.

दरम्यान, चौकशी केली असता संबंधित संस्थेची मान्यता शासनाने रद्द केल्याचे समोर आले. यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादींनी पैसे परत मागितले. त्यावेळी आरोपींकडून टाळाटाळ करण्यात आली. आतापर्यंत आरोपींकडून ५ लाख रुपये परत मिळाले असून उर्वरित १३ लाख ५० हजार रुपये देण्यास नकार देत फोनही उचलत नसल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी सुभाष खेडकर व लिंबराज जाधव यांच्याविरोधात संगनमताने फसवणूक केल्याचा गुन्हा पाथर्डी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव हे करत आहेत.

### कापड व्यापाऱ्याची ४५ लाखांची फसवणूक; चौघांवर गुन्हा दाखल

● **अहिल्यानगर । वीरभूमी**– कपड्यांच्या व्यवसायात असलेल्या पुणे येथील एका व्यापार्याची तब्बल ४५ लाख रूपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अमोल दत्तात्रय येमुल (वय ४४, रा. टिळक रस्ता, अवंती रेसिडेन्सेस, पुणे) असे फसवणूक झालेल्या व्यापार्याचे नाव आहे. त्यांनी सोमवारी (१३ एप्रिल) तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार त्यांच्या आत्याचा मुलगा प्रशांत राजाराम बल्लाळ (रा. बालिकाश्रम रस्ता), राजेंद्र कराळे (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही), आदित्य रमेश परदेशी (पत्ता माहिती नाही), रमेश परदेशी (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी अमोल येमुल हे पेशवाई श्रीमंत या नावाने कपड्यांचा व्यवसाय करत असून पुण्यासह अहिल्यानगर येथे त्यांच्या दुकानाच्या शाखा आहेत. सर्जेपुरा (अहिल्यानगर) येथील शाखा त्यांनी १३ ऑक्टोबर २०१९ रोजी सुरू केली होती. सदर शाखेच्या कामकाजासाठी त्यांनी त्यांच्या आत्याच्या मुलगा प्रशांत बल्लाळ याची मुख्य व्यवस्थापक म्हणून नियुक्ती केली होती. तसेच राजेंद्र कराळे याला विभागीय व्यवस्थापक, आदित्य परदेशी व त्याचे वडील रमेश परदेशी यांना बिलिंग विभागात नेमले होते. येमुल यांच्या म्हणण्यानुसार, दुकानातील सर्व व्यवहारांचे ऑनलाइन रेकॉर्ड पुण्यातील मुख्य सर्व्हरशी जोडलेले होते. दरवर्षी ३१ मार्च रोजी स्टॉक तपासणी केली जात असली, तरी करोना काळात (२०२० व २०२१) ती होऊ शकली नाही. त्यानंतर २०२२ व २०२३ मधील स्टॉक तपासणीत मोठ्या प्रमाणात तफावत आढळून आली. विशेषतः २०२३ मध्ये सुमारे तीन हजार ६०० नग माल कमी असल्याचे निदर्शनास आले, ज्याची किंमत अंदाजे ४५ लाख रूपये आहे.

## निळवंडेच्या उजव्या कालव्यातून १५ तर डाव्या कालव्यातून २५ एप्रिलपासून आवर्तन

### पालकमंत्र्यांच्या निर्णयाने शेतकऱ्यांना दिलासा

● **शिर्डी । वीरभूमी**– अकोले तालुक्यातील निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रातील उच्चस्तरीय आणि उजव्या कालव्यातून १५ एप्रिलपासून पाणी सोडण्याचे निर्देश जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. तसेच डाव्या कालव्याचे आवर्तन २५ एप्रिलपासून सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.



उन्हाची वाढती तीव्रता, लाभक्षेत्रातील गावांमध्ये निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

उच्चस्तरीय कालव्यावरील शेतकऱ्यांनाही या पाण्याचा लाभ मिळावा, ही मागणी पालकमंत्र्यांनी संवेदनशीलतेने मान्य केली आहे. यामुळे अकोले, संगमनेर, राहाता, राहुरी आणि कोपरगाव तालुक्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांनी नुकतीच श्री.विखे पाटील यांची भेट घेऊन आवर्तन सुरू करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर त्यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने नियोजित वेळापत्रकानुसार पाणी सोडण्याच्या सूचना दिल्या आहेत.

निळवंडे धरणातून दोन्ही कालव्यातून आवर्तन सोडले जाणार असल्याने कालव्यात बसून सुरु असलेले आंदोलन शेतकऱ्यांनी मागे घेतले आहे.

SPOT NEWS



## शेवगाव येथे महामानवाला जयंतीनिमित्त आ. मोनिका राजळे यांचेकडून अभिवादन

**● शेवगाव । वीरभूमी –**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवता या मूल्यांची शिकवण देत समाजाच्या उद्धारासाठी आयुष्यभर लढा दिला. अस्पृश्यता निवारणासह शेतकरी व स्त्रियांच्या हक्कांसाठी ते अविरत कार्यरत राहिले. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या या महामानवांच्या कार्याला विनम्र अभिवादन करते, असे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले. आमदार मोनिका राजळे यांनी शेवगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व नागरिकांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## टाकळी काझीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

तालुक्यातील टाकळी काझी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. सिद्धार्थ ग्रुप, टाकळी काझी यांच्या वतीने सिद्धार्थ बौद्ध विहार येथे हा कार्यक्रम पार पडला. या निमित्ताने १२ एप्रिल रोजी भिमगीतांचा भव्य ऑर्केस्ट्रा आयोजित करण्यात आला होता. १३ एप्रिल रोजी लिंबू-चमचा, संगीत खुर्ची यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची रंगत वाढवली. १४ एप्रिल रोजी सकाळी वंदना घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सायंकाळी ७ वाजता भव्य मिरवणूक काढण्यात आली. यानंतर विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. संपूर्ण गावात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाला सरपंच अशोक ढगे, उपसरपंच संदीप म्हस्के, माजी उपसरपंच अविनाश पवार, ग्रामसेवक वैराळ भाऊसाहेब, माजी उपसरपंच हर्षल कांबळे, ग्रामपंचायत सदस्य योगेश शेलार, प्रतीक्षा कांबळे, शंकर ढगे, संतोष घाटे, पवन कांबळे, कुमार कांबळे, लक्ष्मण कांबळे, अमोल सोनवणे, रामा कांबळे, दीपक कांबळे, राहुल ठोंबे, देविदास अरुण, मनोज कांबळे, अनिकेत कांबळे, उदय कांबळे, शाम कांबळे, सुमित कांबळे तसेच सिद्धार्थ ग्रुपचे आजी-माजी सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी माजी उपसरपंच हर्षल कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले.

## पीपल्स हेल्पलाईनकडून डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा जागर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मार्केटयार्ड परिसरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत त्यांच्या तत्वांचा अंगीकार करण्याचा संकल्प व्यक्त केला. उपस्थितांनी जय भीमच्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. तर देशात सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. प्रकाश थोरात, इंजि. अनिल घाटविसावे, नेत्रदूत जालिंदर बोरुडे, प्रथमेश घाटविसावे, आशिष घाटविसावे, सुनील घाटविसावे, प्रियंका निकाळजे, श्वेता गायकवाड, संतोष गायकवाड, सदानंद गायकवाड, सोहम गायकवाड, तन्वी गायकवाड, संजय देवढे, निजाम जहागीरदार, अण्णा लसगरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकाश थोरात म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला मानवी मूलभूत अधिकार प्रदान करून सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समतेची भक्कम पायाभरणी केली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी नवभारताची उभारणी करत प्रत्येक नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे संरक्षण दिले.

# निळवंडेच्या उजव्या कालव्यात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू!

### प्रशासनाच्या दुर्लक्षाचा आरोप । हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे म्हणत शेतकरी आक्रमक

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील निळवंडे धरणाच्या पाणी प्रश्नावरून पुन्हा एकदा संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत शेतकरी व स्थानिक नागरिकांनी सोमवारी रात्रीपासून धामणगाव रोडवरील घोलप नजीक असलेल्या उजव्या कालव्यात बसून टाळ-मृदुंग व भजनाच्या साथीने आंदोलन सुरू केले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी शेतकरी वर्गाने केली आहे.

या पार्श्वभूमीवर सोमवारी सायंकाळी निळवंडेच्या उजव्या कालव्यात तंबू ठोकून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. पाण्याचे योग्य वाटप, कालव्यांमध्ये वेळेवर पाणी सोडणे तसेच शेतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रमुख मागण्यांसाठी या भागातील शेतकरी संतप्त झाले आहेत.



अभी नाही तर कधीच नाही, पाणी आमच्या हक्काचं आहे, कुणाच्या बापाचं नाही अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला आहे. आमच्या डोळ्यासमोरून पाणी वाहत असताना आम्ही शांत का बसावे? धरणे व बंधारे आमच्या भागात असूनही लाभ खालच्या भागाला मिळतो. पाण्यावर आमचाही हक्क आहे, असे म्हणत शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या आंदोलनाची दखल घेतली नाही तर आंदोलनकर्ते शेतकरी कालवा उद्ध्वस्त करण्याचा इशारा देत आहेत. तसेच खाली पाणी जाऊ देणार नाही, प्रसंगी धरणाचे चाक (गेट) बंद करण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

यावेळी ज्येष्ठ नेते डॉ. अजित नवले, शिवसेनेच्या शिंदे गटाचे नेते बाळासाहेब भोर, अकोले कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भानुदास तिकांडे, अगस्ती पतसंस्थेचे उपाध्यक्ष गणेश पापळ, अण्णा शेटे, माजी उपसरपंच अशोक देशमुख यांच्यासह अनेक शेतकरी कालव्यात उपोषणास बसले आहेत. भर उन्हाळ्यात पाण्यासाठी टाहो फोडत शेतकरी भजन व गायन करत आंदोलन करत आहेत.

आंदोलनादरम्यान पाणी आमच्या हक्काचं आहे, कुणाच्या बापाचं नाही; आमचं पाणी आम्हाला मिळालंच पाहिजे, असा ठाम इशारा संघर्ष समितीने दिला. तसेच पालकमंत्र्यांनी या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणीही करण्यात आली.

यापूर्वी शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांची भेट घेऊन हा प्रश्न मांडला होता; मात्र अद्याप ठोस कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

धरण व बंधारे आमच्या तालुक्यात, शेती आमची; पण पाणी आमच्या डोळ्यासमोरून वाहून जाते आणि आम्हाला मिळत नाही. अजून किती बळी गेल्यावर आम्हाला न्याय मिळणार? असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

## पाथर्डीत नृत्य, नाटिका व भीमगीतांतून महामानवाला अभिवादन

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ संचलित गुरु आनंद संगीत मंडळ, आनंद संगीत अकॅडमी (सांस्कृतिक विभाग) व आनंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भीमगीत, प्रबोधनपर गीत, नृत्य व नाटिका यांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



संस्थेचे सचिव सतीश गुगळे, पोलिस निरीक्षक विलास पुजारी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे, माझी आजी म्हणायची, आकाश मोजतो आम्ही भिमा तुझ्या जन्मामुळे, काल मुजरेच केले रे माझ्या मेलेल्या बापाने, छाती ठोक हे सांगू जगाला, दोनच राजे इथे गाजले, भीम सूर्य क्रांतीचा, भीम माझा कोहीनूर हिरा या गीतांनी कार्यक्रमाची रंगत उत्तरोत्तर वाढवत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

याशिवाय आनंद संगीत अकॅडमीच्या सांस्कृतिक विभागामार्फत कथ्थक नृत्यातून सादर केलेली मानवंदना, विविध नृत्यप्रकार तसेच सादर केलेल्या नाटिकांनी विशेष आकर्षण ठरवले. नाटिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक या वृत्तपत्राची स्थापना, समतेचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज यांचे सहकार्य, माणगाव परिषदेमधील बाबासाहेबांचे भाषण, स्वातंत्र्यपूर्व १८ वर्षांपूर्वी शाहू महाराजांनी केलेला गौरव तसेच गिरगाव येथील बाबासाहेबांच्या निवासस्थानी दिलेली भेट अशा प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील कटारिया यांनी केले. या उपक्रमासाठी आतिश भावसार, आदेश कर्णावट, सचिन ढाकणे, संतोष घोगरे, डॉ. श्रीकांत काळोखे, डॉ. अनिल पानखडे, प्रा. सूर्यकांत काळोखे व सुनील मरकड यांनी आनंद सांस्कृतिक विभागामार्फत सादर केलेले सर्व कार्यक्रम विशेष लक्षवेधी ठरले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक संस्थेचे सचिव सतीश गुगळे यांनी केले. तसेच श्री तिलोक जैन परिवारातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी यांनी आभार मानले.

## अकोलेत 'धर्मवीर चषक' क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ

### तरुणांना संधी देणारा उपक्रम । सहा दिवस रंगणार थरारक सामने

**● अकोले । वीरभूमी–**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना राजकारणासोबत समाजकारण करत तरुणांना विविध क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रेरणा देत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ठाण्यासह राज्यातील विविध शहरांमध्ये क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्याच धर्तीवर अकोले शहरात 'धर्मवीर चषक' क्रिकेट स्पर्धेची सुरुवात होत असल्याचा आनंद व्यक्त करत, सर्व तरुणांनी उन्हात खेळताना काळजी घ्यावी आणि खेळाचा आनंद घ्यावा, असे आवाहन शिर्डी संस्थानचे विश्वस्त तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फॅमिली डॉक्टर डॉ. जालिंदर भोर यांनी केले.



अकोले तालुका शिवसेना व अगस्ती क्रिकेट क्लब अकोले यांच्या वतीने आयटीआयच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. जालिंदर भोर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना युवा नेते मारुती मेंगाळ, तालुका प्रमुख सुशांत गजे, शहरप्रमुख सचिन शेटे, कार्याध्यक्ष जगनशेठ देशमुख, बाळासाहेब भोर, मुकुंद भोर, जावेद जाहगीरदार, विशाल शेणकर, वाल्मिक मैड, विक्रम आरोटे, अमोल कपिले, सचिन भालेराव, निलेश शेणकर, महेश धुमाळ, गणेश पांडे, महेश झोळेकर, राम मोहिते, भगवान चौधरी आदी उपस्थित होते.

अकोले तालुका शिवसेना व अगस्ती क्रिकेट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने अकोले तालुक्यातील तरुणांना क्रिकेटमध्ये आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळावी या उद्देशाने आयपीएलच्या धर्तीवर आयटीआय मैदानावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. आजपासून सुरू झालेली ही स्पर्धा सहा दिवस चालणार असून यात ८ संघ सहभागी झाले आहेत. हे संघ तालुक्यातील उद्योजकांनी प्रायोजित केले असून लिलाव पद्धतीने खेळाडू निवडून संघ तयार करण्यात आले आहेत.

स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ५५,५५५ रुपये, द्वितीय पारितोषिक ४४,४४४ रुपये, तृतीय पारितोषिक ३३,३३३ रुपये व चतुर्थ पारितोषिक २२,२२२ रुपये ठेवण्यात आले आहे. विजेत्या संघांच्या मालकांना ट्रॉफीसह सायकलही बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.

अतिशय चुरशीच्या या स्पर्धेमुळे तालुक्यातील तरुण खेळाडूंना आपली कला आणि कौशल्य दाखवण्याची उत्तम संधी मिळत आहे. मोठ्या संख्येने क्रिकेटप्रेमी प्रेक्षक उपस्थित राहतात. उत्कृष्ट समालोचन, अनुभवी पंच, सुसज्ज मैदान, सर्व खेळाडूंना प्रायोजकांकडून ड्रेस कोड व संपूर्ण किट तसेच सर्व सामन्यांचे थेट प्रक्षेपण यामुळे 'धर्मवीर चषक'चा लौकिक वाढला आहे. या स्पर्धेसाठी अगस्ती क्रिकेट क्लब अकोलेचे सर्व सदस्य व अकोले तालुका शिवसेनेचे शिवसैनिक परिश्रम घेत आहेत.

## आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन

**● शेवगाव । वीरभूमी–**

आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या वतीने, आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेवगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी समूहाचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधरजी काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, शिक्षण विभाग सहप्रमुख अशोक आहेर, निर्मल ब्राईट फ्यूचर स्कूलचे प्राचार्य दत्तात्रय मोरे, प्रा. अशोक तमनर, प्रा. ज्ञानेश्वर लबडे, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे, रविंद्र आगळे, अविनाश भागवत तसेच विद्यालय व निर्मल ब्राईट फ्यूचर स्कूल येथील सर्व कर्मचारीवृंद उपस्थित होते. सर्वांनी शेवगाव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधरजी काकडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. भारत देश घडवणाऱ्या महान व्यक्तींमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चंद्र आणि सूर्य असेपर्यंत कायम घेतले जाईल, असे त्यांनी सांगितले. आंबेडकरांनी समाजाला समतेचा आणि स्वातंत्र्याचा मार्ग दिला. समाज आधी सुधारला पाहिजे, तरच स्वातंत्र्य टिकवण्याची क्षमता निर्माण होते, या विचारामुळे त्यांनी सामाजिक सुधारणांवर भर दिला, असे त्यांनी स्पष्ट केले.

आपले विचार व्यक्त करताना ॲड. काकडे पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व इतर महापुरुषांच्या जयंती किंवा पुण्यतिथीच्या दिवशी शाळा व महाविद्यालयांना सुट्टी न देता विद्यार्थ्यांना उपस्थित ठेवून त्यांच्यात महापुरुषांचे विचार रुजवावेत. प्रत्येकाने महिन्यातून किमान एक तरी पुस्तक वाचून ज्ञान संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक सुधारणांचा पाया शिक्षणात आहे. या विचारातूनच १९३३ साली आहिल्यानगर येथे संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज आणि राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या विचारांचा संस्थेला वैचारिक वारसा लाभला आहे, असेही ते म्हणाले. आज महापुरुषांना विशिष्ट जातीपुरते मर्यादित ठेवण्याची प्रवृत्ती दिसते; हे चित्र बदलण्यासाठी शिक्षण हाच प्रभावी मार्ग आहे, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी श्री. के. डी. जाधव सर आणि प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर यांनीही उपस्थितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. अनिल जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती जरीना शेख मॅडम यांनी केले.

# माणूसपण हरवलेले जग

**आपण प्रत्येकजण म्हणतो, हल्ली माणसांमध्ये माणुसकी जिवंत राहिलेली नाही. अहो, माणुसकीचे काय घेऊन बसलात? मुळात 'माणूस' नावाचा प्राणी नावालाच जिवंत आहे. त्याच्या माणसाप्रती असलेल्या सर्व भावना जणू मरून गेलेल्या आहेत. सोशल मीडियावर आपण अनेक व्हिडिओ पाहतो. अगदी क्षुल्लक कारणावरून भररस्त्यात, भरचौकात एखाद्याला सपासप वार करून संपवले जाते. आणि आम्ही मात्र मध्यस्थी न करता, तो कसा मारतोय आणि मरणारा कसा मला वाचवा म्हणून विनवतोय, याचे चित्रीकरण करण्यात मग्न असतो.**

पूर्वीचा काळ, पूर्वीचा माणूस कमी शिकलेला होता; पण समाजाप्रती तो माणूस म्हणून खूप चांगला होता. जुन्या माणसांच्या अंगी दया, माया, ममता ठासून भरलेली होती. एकमेकांप्रती आदर करणारी ती माणसं होती. गावात कुठे भांडण झाले, तर मध्यस्थी करून ते तिथल्या तिथे मिटवले जात होते. दोघांनाही समजावून सांगितले जात होते आणि तेही मध्यस्थांच्या शब्दांचा मान राखून ऐकत होते. पुन्हा गावात गुण्यागोविंदाने, मिळून मिसळून राहत होते.

आज माणूस नावालाच माणूस राहिला आहे. पूर्वी माणूस राक्षसाला घाबरत होता, पण आता माणूस 'माणूस' नावाच्या राक्षसालाच घाबरत आहे. सोशल मीडियावर आपण अनेक व्हिडिओ पाहतो, ज्यामध्ये छोट्या-छोट्या चुकीसाठी टोळक्याकडून एखाद्याला अमानुष मारहाण केली जाते आणि त्याची हत्या केली जाते. या तरुण पिढीला काहीच वाटत नाही-फक्त बदला घ्यायचा असतो.

अरे, एवढंच गरम रक्त असेल तर घरपरिवाराची परिस्थिती सुधारण्यासाठी कष्ट करा. वाईट मार्गाने जीवन जगाल तर शेवट वाईटच होणार. क्षणभराचा राग अनावर झाला की हे राक्षसी प्रवृत्तीचे लोक माणसांना जिवंत माणसांसमोर तलवारीने, काठ्यांनी, चाकूंनी ठार मारतात.

एखाद्याची कितीही आणि कसलीही चूक असली तरी त्याला पोलिसांच्या ताब्यात द्या. जेलची हवा खाऊन बाहेर आला की त्याच्यात थोडी तरी सुधारणा होईल. पण असे माणसाला माणसासमोर रस्त्यावर संपवू नका हो. या राक्षसी प्रवृत्तीच्या माणसांमध्ये राहण्याची भीती वाटते.

या पिढीत सहनशीलता नावाचा प्रकारच उरलेला नाही. छोट्या-छोट्या गोष्टींचा रागही यांना सहन होत नाही. पूर्वीचा माणूस कायद्याला घाबरून राहत होता, त्यामुळे तो चुका करत नव्हता. आता महिलांनाही भररस्त्यात अमानुषपणे मारहाण केली जाते. केवळ मारहाणच नव्हे, तर त्यांची हत्या देखील केली जाते.


वीरभूमी
सौ. आशा सुधीर साठे
सैनिकपत्नी,
अहिल्यानगर
९६०४०५६९२८

आणि आपण नावालाच जिवंत असलेली माणसं हा रक्तरंजित खेळ उघड्या डोळ्यांनी पाहतो आणि त्याचे चित्रीकरण करतो.

सगळ्यांना जगण्याचा अधिकार आहे. नुकताच नांदेडमधील एका घटनेचा व्हिडिओ पाहण्यात आला. त्यामध्ये आजूबाजूला वर्दीत असलेले पोलिस दिसत होते, आणि त्यांच्या समोर एकजण दुसऱ्याला भोसकत होता. पण पोलिसांनी त्याला वाचवण्याची जराही तसदी घेतली नाही-फक्त बघ्याची भूमिका पार पाडली. समोरचा एक माणूस आहे एवढंच पाहून त्याचा जीव वाचवणे हे त्यांचे कर्तव्य होते.

जनतेचे रक्षक खरंच जनतेचे रक्षण करतात का? आणि करतील का? हा प्रश्न मनाला भेडसावतो. नांदेडमध्ये अनेक खाजगी आणि सरकारी महाविद्यालये आहेत. तिथे शिक्षणासाठी दूरदूरून मुले-मुली येतात. पण पोलिसांसमोर खून होताना ते फक्त बघत राहतात, हे पाहून अनेक पालकांना आपल्या मुलांच्या सुरक्षिततेची चिंता वाटणे स्वाभाविक आहे.

आपण नक्कीच माणूस म्हणून उरलेलो नाही, हे सत्य आहे. आगामी काळ खूप भयंकर असू शकतो. त्यामुळे आपल्या लेकरांना सुसंस्कार द्या. पैसा जास्त झाला म्हणून कुणाची गरज नाही असे समजू नका. एक माणूस म्हणून दुसऱ्या माणसाचा आदर करायला मुलांना लहानपणापासून शिकवा. अति लाड करू नका. हट्ट जरूर पूर्ण करा, पण तो शिक्षणासाठी-पुस्तकांसाठी, फी भरण्यासाठी असावा. त्यामुळे त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल आणि तो देशाचा चांगला



नागरिक बनेल.

आधुनिक काळातील पालकांनो, पैसा कमी कमावला तरी चालेल; पण तुमच्या मुलांना चांगला नागरिक बनवण्यासाठी त्यांना वेळ द्या, संस्कार द्या. तुमच्यासमोर हे खूप मोठे आव्हान आहे.

पहा, पटतंय का मनाला पण माणूस म्हणून आपण जगूया आणि दुसऱ्यालाही जगू देऊया.

## SPOT NEWS



### मातंग चेतना परिषदेची पाथर्डी तालुका कार्यकारणी जाहीर

**● पाथर्डी । वीरभूमी–**

मातंग समाजाच्या संघटन बळकटीसाठी कार्यरत असलेल्या मातंग चेतना परिषद महाराष्ट्र राज्याच्या पाथर्डी तालुका कार्यकारणीची नुकतीच घोषणा करण्यात आली. दि. १० एप्रिल रोजी पाथर्डी येथे आयोजित बैठकीत प्रांत प्रमुख निशांत नन्नवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यकारणी जाहीर करण्यात आली. या बैठकीत रवी मोहिते यांची पाथर्डी तालुका प्रमुखपदी, तर राजू भालेराव यांची सह–तालुका प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांची निवड होताच उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत करत अभिनंदन केले. यावेळी समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते दीपक दिनकर यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात संघटन विस्तार, समाजातील विविध प्रश्न, तसेच आगामी उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी अविनाश खुडे, सारंग मंत्री, सतीश दिनकर, ज्ञानेश्वर सातपुते, बजरंग सोळसे, संतोष वाघमारे, विकास दिनकर आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीला ७५ ज्येष्ठांना मिळाली नवदृष्टी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पुढाकाराने नुकतेच घेण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शिबिराच्या माध्यमातून ५७ ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाली. पुणे येथे मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होवून ज्येष्ठ नागरिक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात परतले. शहरात परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी बाबासाहेबांना अभिवादन करुन त्यांचा जय घोष केला. फिनिक्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत केले. आगळ्या–वेगळ्या पध्दतीने दृष्टीदोष असलेल्या गरजू घटकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेने त्यांना नवदृष्टी देऊन बाबासाहेबांची जयंती उपेक्षितांना आधार देऊन साजरी करण्यात आली. शस्त्रक्रिया झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीहीन रुग्णांना दृष्टी मिळण्यासाठी जिल्ह्यात फिनिक्स फाऊंडेशनने मोठी चळवळ उभी केली आहे. दरवर्षी महापुरुषांच्या जयंती–पुण्यतिथीनिमित्त फिनिक्सच्या माध्यमातून शिबिर घेऊन गरजूंवर पुणे येथील के.के. आय बुधराणी मध्ये मोफत मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया केल्या जात आहे. आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीहीन रुग्णांना दृष्टी मिळण्यासाठी हे शिबिर आधार ठरत आहे. बाबासाहेबांनी संपूर्ण आयुष्य दीन–दुबळ्यांसाठी वेचले त्यांच्या कार्याचा आणि विचाराचा वारसा घेऊन फिनिक्स फाऊंडेशन कार्य करत असल्याचे जालिंदर बोरुडे यांनी सांगितले. दर महिन्याला गरजू रुग्णांसाठी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन केले जाते. या शिबीराच्या माध्यमातून नेत्रदान व अवयवदानाची देखील जनजागृती सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली.

### बीएसएनएलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्साहात व जल्लोषात कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रश्नमंजुषा, भिमगीते आणि प्रेरणादायी भाषणांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. कार्यक्रमाची सुरुवात बीएसएनएलचे महाप्रबंधक राजेंद्र चोंगड, डेप्युटी जनरल मॅनेजर विश्वनाथ वाघ, एससी–एसटी वेल्फेअर असोसिएशनचे मुख्य सल्लागार प्रदीपकुमार जाधव, डीजीएम फायनान्स झोळे साहेब, सेवा बीएसएनएलचे सचिव गजेंद्र पिसे आणि प्रशासकीय अधिकारी राहुल मोरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमासाठी गणेश जोशी, भावसार, अनंतरे, पिंपरकर, सोमनाथ जगताप, विश्वनाथ वाघ, झोळे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन गजेंद्र पिसे यांनी केले तर प्रशासकीय अधिकारी राहुल मोरे यांनी आभार मानले. या प्रसंगी प्रविण सोनवणे, घोडके, कुलकर्णी, बांबेरे, प्रशांत मेहेरा, जोगदंड, गुप्ता, मोरे मॅडम, विजय उबाळे आदी मान्यवर तसेच बीएसएनएलचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे आचरण करणे गरजेचे

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती तसेच सामाजिक समता सप्ताहाचा समारोप

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताच्या संविधानाचे शिल्पकार नव्हते तर ते सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते. त्यांचे विचार आणि जीवनमूल्ये आजही समाजाला दिशादर्शक ठरतात. त्यांच्या विचारांचे आचरण प्रत्येकाने आपल्या आयुष्यात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती तसेच सामाजिक समता सप्ताहाच्या समारोपानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, जात पडताळणी विभागाचे सदस्य सचिव अनिल तिदमे, व्याख्याते डॉ. बापू चंदनशिवे, सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगुटमल, संजय आरणे आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ.आशिया म्हणाले , भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवून देण्याचे महान कार्य केले. त्यांनी देशातील सर्वसामान्य नागरिकांना मतदानाचा अधिकार प्रदान केला आणि लोकशाहीची भक्कम पायाभरणी केली; त्यामुळेच आजही देशातील लोकशाही सक्षमपणे टिकून आहे.

समाजातील विषमता दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर अखंड संघर्ष केला. त्यांनी सर्व घटकांना सोबत घेत समानतेचा मार्ग समाजासमोर ठेवला. त्यांच्या विचारांचा आपल्या दैनंदिन जीवनात अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी दिलेले मार्गदर्शन आत्मसात करून आपण समाजात सकारात्मक आणि शाश्वत परिवर्तन घडवू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. बापू चंदनशिवे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानवी हक्कांचे जतन व प्रतिपालन करणारे महान व्यक्तिमत्त्व होते. समाजातील विषमता त्यांनी सखोल अभ्यासातून ओळखून ती दूर करण्यासाठी आयुष्यभर सातत्याने संघर्ष केला.

'मूकनायक' या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी वंचित, शोषित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडली. तसेच महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहातून सामाजिक समतेसाठी त्यांनी ऐतिहासिक लढा उभारला. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा संगम असलेली राज्यघटना देशाला देऊन डॉ. आंबेडकरांनी समाजव्यवस्थेला नवी दिशा दिली आहे.

डॉ. सुरेश मुगुटमल म्हणाले , डॉ. आंबेडकर हे सामाजिक न्यायाचे प्रणेते होते. त्यांनी देशातील प्रत्येक नागरिकाला सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार घटनेच्या माध्यमातून दिला. स्वातंत्र्यानंतर देशामध्ये सुराज्याची स्थापना आदर्श घटनेमुळेच होऊ शकली. त्यातूनच आपला देश एकसंघ राहिला आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी समता सप्ताहामध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांची तसेच विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच विविध योजनांमधील लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले, तर आभार डॉ. प्रदीप जारे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, विद्यार्थिनी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### विश्व नवकार महामंत्र दिनानिमित्त विश्व शांतीसाठी पाथर्डीत सामुहिक महामंत्र जाप

**● पाथर्डी । वीरभूमी–**

जितो या जागतिक पातळीवर काम करणाऱ्या जैन संघटनेने केलेल्या आवाहनुसार आज संपूर्ण भारत देशासह जगातील सुमारे १२६ देशांमध्ये नवकार महामंत्र दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पाथर्डी येथील जैन स्थानकामध्ये परमपूज्य महासतीजी सुनंदाजी महाराज साब आणि इतर जैन साध्वी यांच्या उपस्थितीमध्ये पाथर्डीतील सर्व जैन बांधवांनी एकत्रित येऊन नवकार महामंत्राचा जाप सकाळी साडेसात ते साडेआठ या वेळेमध्ये करण्यात आला.



यावेळी परमपूज्य सुनंदाजी महाराज यांनी आजच्या युगामध्ये तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असलेल्या जगामध्ये नवकार महामंत्राचे महत्त्व आणि त्याची महत्ता आपल्या प्रवचनद्वारे सांगितली. त्यांनी नवकार मंत्रावर श्रद्धा व नवकार महामंत्राची शक्ती यावर भाष्य केले. पाथर्डी जैन श्रावक संघाचे सचिव सुरेश गुगळे यांनी नवकार मंत्राचे रोज स्मरण केल्याने जीवनामध्ये कोणतीही संकटाला सामोरे जाण्याची शक्ती मिळते, असे महत्त्व विशद केले. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात जैन बांधव व भगिनी उपस्थित होत्या. जितो चे टाऊन रिप्रेझेंटेटिव्ह अनिल खाटेर यांनी विशेष पत्रकाद्वारे सकल जैन बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले होते. पाथर्डी येथे आगामी मे महिन्यात अकरा तारखेला होणाऱ्या दीक्षा महोत्सवासाठी परमपूज्य सुनंदाजी महाराज साहेब आदी सतियाजी यांचे पाथर्डी येथे आगमन झाले आहे त्यांचे शहरातील जैन बांधवांनी उत्साहात स्वागत केले.

### वांगदरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त वांगदरी (जुनी) येथील विश्वशांती बुद्धविहार परिसरात उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



या जयंती सोहळ्याचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा प्रतिष्ठान, वांगदरी (जुनी) यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. कार्यक्रमास वांगदरी गावचे माजी सरपंच तुषार नागवडे, पोलीस पाटील सुभाष गोरे, वांगदरी विकास सोसायटीचे विद्यमान चेअरमन राजेंद्र निळकंठ नागवडे तसेच माजी चेअरमन विजय नागवडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान लहान मुलांपासून ते तरुण आणि ज्येष्ठ ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. विशेषतः चिमुकल्यांनी जयंतीनिमित्त सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा प्रतिष्ठान, अंबिका माता तरुण मंडळ आणि शिवशंभो तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीरीत्या पार पडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अविनाश उबाळे यांनी केले.

## पुण्यात युपीएससी २०२५ यशवंतांचा गौरव सोहळा उत्साहात

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) २०२५ च्या सनदी सेवा परीक्षेत यश संपादन केलेल्या महाराष्ट्रातील उमेदवारांचा भव्य सत्कार सोहळा पुण्यातील हॉटेल ग्रँड शेराटन, बंडगार्डन रोड येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर (IAS, निवृत्त) यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी तेलंगणा राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) आणि णझडउ मार्गदर्शक महेश भागवत (IPS) होते.

कार्यक्रमाला DYPU चे संचालक डॉ. सोमनाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते राज देशमुख, संपादक विजय बाविस्कर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर, तसेच आयकर, वनसेवा, CISF आणि इतर विभागांतील वरिष्ठ अधिकारी व मार्गदर्शक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्हॉट्स ॲप ग्रुपद्वारे मार्गदर्शनाची अनोखी पहल महेश भागवत यांच्या नेतृत्वाखाली २०१६ पासून सुरू झालेल्या व्हॉट्सप ग्रुपद्वारे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीसाठी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाचा मोठा फायदा देशभरातील विद्यार्थ्यांना झाला आहे. गेल्या दहा वर्षांत या उपक्रमातून २०२५ हून अधिक उमेदवार प्रशासनात दाखल झाले आहेत, अशी माहिती आयआरएस अधिकारी नितीश पाथीडे यांनी दिली. या ग्रुपद्वारे सिव्हिल सेवा, वन सेवा आणि CAPF AC परीक्षांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन गट कार्यरत असून, विविध विषयांवर तज्ज्ञ अधिकारी नियमित मार्गदर्शन करतात. प्रेरणादायी विचार अध्यक्षीय भाषणात महेश भागवत यांनी युपीएससी उमेदवारांनी समाजाभिमुख आणि पारदर्शक प्रशासन देण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असे आवाहन केले. तसेच मराठी विद्यार्थ्यांचा टक्का वाढत असला तरी टॉप १०० मध्ये संख्या कमी असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

मुख्य पाहुणे डॉ. नितीन करीर यांनी विद्यार्थ्यांनी सातत्याने वाचन करून स्वतःला अद्ययावत ठेवावे आणि लोकाभिमुख प्रशासनावर भर द्यावा, असे मार्गदर्शन केले. यशस्वी उमेदवारांचा गौरव युपीएससी २०२५ मध्ये देशभरातून ९६० उमेदवार निवडले गेले असून, त्यापैकी ३२१ जणांना महेश भागवत आणि त्यांच्या टीमचे मुलाखत मार्गदर्शन मिळाले होते. महाराष्ट्रातील ५५ यशस्वी



उमेदवारांमध्ये दिपाली महतो (रँक ३६), आकाश त्रिवेदी (७३) आणि गौरव चोप्रा (८३) यांचा टॉप १०० मध्ये समावेश आहे. या सोहळ्यात ऋतुजा गायकवाड (रँक १०६), कार्तिक बच्छाव, श्रावण मुंद्रा, मोहिनी जगताप, अभिषेक ओझर्डे, हर्षवर्धन तिडके, रजत वाळके (CRPF AC), रेणुका केकानं (PWBD) यांसह अनेक यशस्वी उमेदवारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यशस्वींचा अनुभव सत्काराला उत्तर देताना अनेक विद्यार्थ्यांनी व्हॉट्सप ग्रुपमुळे मुलाखतीची तयारी सुलभ झाली असल्याचे सांगितले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवलेल्या उमेदवारांनी भविष्यात प्रशासनात उत्तम कामगिरी करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाचे संयोजन DYPU च्या सहकार्याने करण्यात आले. शेवटी आयोजक राज देशमुख यांनी आभार मानले.

# निघोज येथील कुंडमाऊली यात्रेतील कुस्ती स्पर्धेची दणदणीत सांगता

## निघोजमध्ये कुस्ती महासंग्राम । पैलवानांवर पाच लाखांची बक्षिसांची खैरात

**● निघोज । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील निघोज येथील कुंड पर्यटन क्षेत्रात कुंडमाऊली यात्रेनिमित्त आयोजित कुस्ती स्पर्धांचा दणदणीत समारोप उत्साहात झाला. निघोज ग्रामस्थ, कुस्ती शौकीन व मळगंगा यात्रा उत्सव समिती यांच्या वतीने नामांकित पैलवानांना सुमारे पाच लाख रुपयांची बक्षिसे देण्यात आली. तसेच कन्हैया दूध उद्योग समूहाचे संस्थापक शांताराम मामा लंके यांच्या स्मरणार्थ शेवटची ५१ हजार रुपयांची कुस्ती लावण्यात आली.

दुपारी तीन वाजता सुरू झालेला कुस्त्यांचा महासंग्राम रात्री आठ वाजेपर्यंत रंगला. अहिल्यानगर, पुणे, मुंबई, कोल्हापूर, दिल्ली आणि हरियाणा येथील नामांकित पैलवानांनी सहभाग घेतला होता. हजारो कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पैलवानांचे डावपेच पाहण्याचा आनंद लुटला.

कुस्त्यांचे उत्कृष्ट नियोजन मळगंगा यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, उपाध्यक्ष अर्जुन लामखडे, सचिव ज्ञानेश्वर वरखडे तसेच दिलीप ढवण, पोपटराव लंके, संतोष ढवण, रामदास रसाळ, रमेश वरखडे, भास्कर कवाद, विजय वराळ, मंगेश वराळ, माजी उपसरपंच उमेश सोनवणे, ॲड. गणेश लाळगे, रविंद्र लंके, गुलाब काळे, मयूर लंके, पंढरीनाथ लंके, प्रभु लंके आदी पदाधिकाऱ्यांनी केले.

या कुस्त्यांना पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य राजेंद्र गावडे, पारनेरचे पोलिस निरीक्षक संतोष खेडेकर, जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, माजी सभापती मधुकर उचाळे, माजी उपसभापती खंडू भुकन, शिवव्याख्याते प्रा. ॲड. ज्ञानेश्वर कवाद, शिवसेनेचे शेतकरी विभाग तालुकाप्रमुख महेंद्र पांढरकर, उपतालुकाप्रमुख देवराम लामखडे, उद्योजक सुधीर वरखडे, खंडू घुले यांच्यासह विविध गावांचे सरपंच उपस्थित होते.



यात्रा समितीने जवळपास दोन लाख रुपयांची बक्षिसे दिली, तर ग्रामस्थ व कुस्ती शौकीनांनी ५०० ते ५ हजार रुपयांपर्यंत बक्षिसे देत पैलवानांचा उत्साह वाढवला. एकूण सुमारे पाच लाख रुपयांची बक्षिसे देण्यात आली.

### लंके व लामखडेंकडून ६१ हजारांची कुस्ती

■ शेवटची कुस्ती पै. निलेश उचाळे व पै. सार्थक वाळुंज यांच्यात ६१ हजार रुपयांची लावण्यात आली. ही कुस्ती मळगंगा यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके व उपाध्यक्ष पै. अर्जुन लामखडे यांनी वैयक्तिक स्वरूपात लावली होती.

### मुलींनीही मारले मैदान

■ निघोजच्या आखाड्यात मुलांबरोबर मुलींनीही सहभाग घेत कुस्त्यांचे मैदान गाजवले. पंच म्हणून बाळासाहेब लामखडे, अर्जुन लामखडे, सुभाष वराळ, नवनाथ लामखडे, गुंडा भोसले, अमोल लंके व काशिनाथ वराळ यांनी काम पाहिले.

# अतिक्रमणे व फ्लेक्स बोर्ड हटवून महापुरुषांच्या स्मारकांचे पावित्र्य जपा

## आमदार मोनिकाताई राजळे । पाथर्डीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**पाथर्डी । वीरभूमी –**

थोरामोठ्यांची प्रेरणा, ऊर्जा व शिकवण मिळावी म्हणून महापुरुषांची पुतळे व स्मारके उभारली जातात. मात्र, या पुतळ्यांभोवती अतिक्रमणे व फ्लेक्स बोर्ड लावले जात असल्याने त्यांचे पावित्र्य धोक्यात येत आहे. पालिका व पोलीस प्रशासनाने सौजन्याने सांगूनही संबंधितांकडून दुर्लक्ष होत असेल, तर प्रशासनाने कडक कारवाई करावी. राष्ट्रपुरुष व महामानवांनाही उत्साही फ्लेक्स लावणाऱ्यांनी झाकून टाकल्याचे पाहून वाईट वाटते. आपण सण-उत्सव डीजे वाजवून त्यापुढे नाचण्यासाठी करतो का, असा सवाल करत आमदार मोनिका राजळे यांनी खंत व्यक्त केली व फ्लेक्स हटाव मोहिमेचे स्पष्ट आदेश दिले.

आंबेडकर स्मारकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी ज्येष्ठ नेते अ‍ॅड. प्रताप ढाकणे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, पोलीस निरीक्षक विलास पुजारी, श्री तिलोक मंडळाचे सचिव सतीश गुगळे, वंचित बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष प्रा. किसन चव्हाण आदी व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, माध्यम प्रतिनिधी तसेच आंबेडकरी चळवळीतील विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे आणि शाळकरी विद्यार्थ्यांसह डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. यंदा कार्यकर्त्यांचा उत्साह अधिक असल्याने विविध गटांकडून स्वतंत्र कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याबाबत आमदारांसह सर्वपक्षीय नेत्यांनी खंत व्यक्त करत एकतेचा संदेश दिला.

गेल्या काही दिवसांपासून शहरात विविध जयंती, पुण्यतिथी, धार्मिक कार्यक्रम, शोकसंदेश, जाहिराती, शुभेच्छा व वाढदिवस निमित्ताने जागोजागी फ्लेक्स बोर्ड लावले जात आहेत. विजेचे खांब, रस्ते दुभाजक, मोठ्या इमारती, शासकीय इमारतींचे कंपाउंड याठिकाणी हे बोर्ड लावले जातात. अनेकदा संबंधित ऑर्डर पूर्ण होईपर्यंत हे बोर्ड तसेच राहतात. त्यामुळे व्यापाऱ्यांचे फलक झाकले जातात आणि सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता वाढते. पालिकेचा महसूलही बुडतो. कोणते आणि किती फ्लेक्स लावायचे यासाठी नियमावली असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

फ्लेक्स लावण्याबरोबरच ते काढण्याची जबाबदारीही निश्चित केली पाहिजे. छपाई करणाऱ्या व्यावसायिकांनी पालिका प्रशासनाची परवानगी व कालावधीची पावती ग्राहकांकडून घेणे आवश्यक आहे. महानगरपालिका क्षेत्रात परवानगीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच फ्लेक्स लावले जातात, याची अंमलबजावणी येथेही करावी, असे सुचविण्यात आले.

यावेळी आमदार राजळे म्हणाल्या की, महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीचे पावित्र्य जपलेच पाहिजे. आंबेडकर स्मारकासारखी सुंदर वास्तू शहरात उभी राहिली आहे. डॉ. बाबासाहेबांचा विचार अमलात आणून समाजाचे हित साधले पाहिजे. त्यांच्या 'संघटित व्हा' या संदेशाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. शेवगाव येथे तीन तर पाथर्डीत चार कार्यक्रम झाले, ही बाब खेदजनक आहे. इतर वेळी मतभेद असले तरी जयंती महोत्सवात तरी सर्वांनी एकत्र यावे.

शहरातील फ्लेक्स बोर्ड पाहिल्यावर नेमके काय साध्य करायचे आहे, असा प्रश्न निर्माण होतो. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यात आले, मात्र त्याभोवती फळविक्रेते, भाजीविक्रेते व फ्लेक्समुळे पुतळाच दिसत नाही, ही बाब खेदजनक आहे. आपण शिस्त पाळत नाही आणि प्रशासनाला दोष देतो, हे योग्य नाही. आता या प्रश्नात ठोस पावले उचलावी



लागतील. पोलिसांनी आठ दिवसांनंतर विनापरवाना फ्लेक्सवर कारवाई करावी, तर पालिकेने फ्लेक्ससाठी विशिष्ट जागा व कालमर्यादा निश्चित करावी.

आपणच पुतळे उभारायचे आणि त्यांच्याभोवती अतिक्रमण करायचे, हे योग्य नाही. कोणत्याही नेत्यांचे वाढदिवसाचे बोर्ड लावू नयेत. बोर्ड लवकर काढून इतरांनाही संधी द्यावी. सध्या तरुण कार्यकर्त्यांची संख्या वाढली आहे. मात्र, अनेक ठिकाणी नेत्यांचा फोटो लहान आणि कार्यकर्त्यांचा मोठा दिसतो. पंचायत समितीसमोर तर एवढे मोठे बोर्ड लावले जातात की छत्रपतींचा पुतळा व शासकीय इमारती झाकल्या जातात. आपण छत्रपतींपेक्षा मोठे आहोत का, याचा विचार प्रत्येकाने करावा. पुतळ्यांचे पावित्र्य जपले पाहिजे. महामानवांनी दिलेला विचार व वारसा जीवनात आचरणात आणला तरच व्यासपीठावर बोलण्याचा अधिकार प्राप्त होईल, असे त्या म्हणाल्या.

आरपीआयचे तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविक करताना प्रा. दिगंबर गाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याची मागणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश अंगरखे यांनी केले. विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# मराठी पत्रकार परिषदेचे रविवारी उदगीर येथे राष्ट्रीय अधिवेशन

**अकोले । वीरभूमी –**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचं ४४ वं राष्ट्रीय अधिवेशन १८ आणि १९ एप्रिल २०२६ रोजी रोजी उदगीर इथे होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहात असून संपादक राजेंद्र दर्डा अधिवेशनाचे उद्घाटन करतील. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष आहेत तर आमदार संजय बनसोडे सह स्वागताध्यक्ष आहेत. परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील तर मिलिंद अष्टीवकर हे अधिवेशनाचे अध्यक्ष असतील. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांचे मार्गदर्शन पत्रकारांना लाभणार आहे.

१८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुलात अधिवेशनाचे उद्घाटन होईल. तत्पूर्वी उदगीर शहरातून प्रभात फेरी काढली जाणार असून त्यामध्ये शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी होतील. दुपारच्या सत्रात उदगीरमधून बाहेर पडून पत्रकारितेच्या क्षेत्रात देदीप्यमान यश मिळविणारया पत्रकारांचा सत्कार आणि त्यांच्या मनोगताचा कार्यक्रम होईल. दुपारी ४ ते ५.३० या वेळेत लोकप्रतिनिधींच्या माध्यमांकडून अपेक्षा या विषयावर रोहीत पवार यांची मुलाखत घेतली जाणार आहे. रात्री ७ वाजता मनोरंजनाचा कार्यक्रम होईल. १९ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे याची मुलाखत होईल. संपादक प्रसन्न जोशी ही मुलाखत घेतील. सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत माध्यमं सत्ताधाऱ्यांना झुकतं माप देताहेत का? या विषयावरील परिसंवादात केशव उपाध्ये, हनुमंत पवार, सुरज चव्हाण, राहूल लोंढे, जयेश वाणी हे विविध राजकीय पक्षांचे प्रवक्ते सहभागी होतील. पत्रकारांची बाजू मांडतील ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई. दुपारी १.३० ते ३ या वेळेत टीव्हीच्या पडद्यावरची दुनिया या विषयावरील चर्चेत प्रसन्न जोशी, विशाल परदेशी, प्रज्ञा पोवळे, श्वेता दांडेकर, सौरभ कोरटकर, विशाल पाटील सहभागी होतील.

दुपारी ३ ते ५ या वेळात अधिवेशनाचा समारोप समारंभ होईल. संपादक प्रसाद काथे आणि संपादक तुळशीदास भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. एस. एम. देशमुख कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. समारोप समारंभात लातूर जिल्ह्यातील काही मान्यवर पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे.

अधिवेशनास राज्यातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहण्याचं आवाहन विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रमुख अनिल वाघमारे, विभागीय सचिव तसेच अधिवेशन मुख्य संयोजक सचिन शिवशेट्टे, रवी उबाळे, उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, उदगीर तालुका मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष युवराज धोतरे, लातूर जिल्हा डिजिटल मिडीयाचे अध्यक्ष बिभीषन मद्देवाड, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक अर्जुन जाधव, जिल्हा डिजिटल मिडीयाचे सचिव सिद्धार्थ सुर्यवंशी यांनी केले आहे.

# पारनेर मध्ये भाजपच्या वतीने महामानवाला अभिवादन

**पारनेर । वीरभूमी –**

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा! हा महामंत्र देऊन कोट्यवधी शोषितांच्या आयुष्यात प्रकाशाची पहाट निर्माण करणाऱ्या, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती पारनेरमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय जनता पार्टी, पारनेर तालुक्याच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी आयोजित अभिवादन सभेत भाजप महाराष्ट्र राज्य परिषदेचे सदस्य विश्वनाथ दादा कोरडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, विद्वत्ता ही तलवारीच्या धारेपेक्षाही तीक्ष्ण असते आणि जेव्हा



ती मानवतेच्या कल्याणासाठी वापरली जाते, तेव्हाच ती सार्थ ठरते. बाबासाहेबांचे हेच विचार डोळ्यासमोर ठेवून भारतीय जनता पार्टी सदैव कार्यरत आहे. समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांची जोपासना करून प्रगत व समृद्ध भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण सर्व कटिबद्ध होऊया.

या कार्यक्रमादरम्यान पारनेर तालुक्यातील भाजप परिवारातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास आणि न्याय पोहोचवणे हेच बाबासाहेबांना खरे अभिवादन ठरेल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.या प्रसंगी तालुक्यातील भाजपचे प्रमुख पदाधिकारी, आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सुभाषराव दुधाडे, शंकरराव नगरे, दत्ता नाना पवार, कल्याणराव थोरात.शिवाजी काका खिलारी, राजेंद्र उबाळे, दादाभाऊ वारे, प्रभावतीताई मोरे, सोनालीताई आंबेकर, लहू भालेकर, मधुकर पठारे. प्रमोद कावरे, नगरसेवक अशोक चेडे, ड.तुषार औटी, मनोज मुंगसे दिनेशराव बाबर, रमेश गाडगे, अर्जुनराव नवले, कानिफनाथ ठुबे, समीर झगडे, प्रथमेश मोरे, भरत ठुबे, सुजित मुळे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या स्मारकास अभिवादन केले. संपूर्ण परिसरात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' आणि 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण चैतन्यमय झाले होते. पारनेर तालुक्यातील भाजपच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, सामाजिक सलोख्याचा संदेश या निमित्ताने देण्यात आला.

# ज्ञानेश्वर उद्योग समूहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**नेवासा । वीरभूमी –**

तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वर उद्योग समूह व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी ज्ञानेश्वर कारखान्याचे उपाध्यक्ष तथा माजी आमदार पांडुरंग अभंग यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रविंद्र मोटे, कामगार संचालक सुखदेव फुलारी, तांत्रिक सल्लागार एम. एस. मुरकुटे, एस. डी. चौधरी, भगवंता शेंडगे, महेश भवर, प्रशासकीय अधिकारी कल्याणराव म्हस्के, सुधाकर ढाकणे, कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, संभाजीराव माळवदे, विष्णुपंत वाबळे, परशुराम गोरे, बप्पासाहेब बामदळे, शिवाजी वाबळे, एन. पी. शिंदे, उपशेतकी अधिकारी तथा सांस्कृतिक मंडळाचे सचिव नंदकिशोर पाटील, मानद सचिव आप्पासाहेब बोडखे, शोयब शेख, गणेश ओहळ, सचिन मरकड, श्रीरंग जाधव, कल्याण गायकवाड, धीरज अंधारे, पोपट उगले, दत्तात्रय चिमणे, हरिभाऊ आरगडे, हरिभाऊ तागड, शिवाजी फुलारी, भैया फटांगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षण व बुद्धिमत्तेच्या बळावरच 'विश्वरत्न' पदवी

## अनिल मगर । चापडगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**शेवगाव । वीरभूमी–**

हिरा हा अमूल्यच असतो. शिक्षण आणि बुद्धिमत्तेच्या क्षमतेवरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'विश्वरत्न' ही पदवी मिळाली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा काही अंशी आपल्या जीवनात स्वीकार करावा, असे प्रतिपादन पर्यवेक्षक अनिल मगर यांनी केले.

चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण, संजय दुधाडे, अशोक



आघवणे, दादासाहेब ज्योतीक, आत्माराम झरेकर, शरद सुपारे, वत्सला जाधव, शितल दहिवाळकर, सुरेंद्र लोहकरे, किरण गोरे, सर्जेराव निकाळजे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, साहित्याचे खरे डॉक्टर म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांनी जगाला उच्च दर्जाची राज्यघटना दिली. तसेच शेळी बनून शंभर दिवस जगण्यापेक्षा एक दिवस वाघासारखे जगा आणि तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकर घ्या व एक रुपयाचे पुस्तक घ्या, या त्यांच्या विचारांचा उल्लेख करून विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

शिक्षक प्रतिनिधी म्हणून सर्जेराव निकाळजे, किरण गोरे, श्रीकांत त्र्यंबके यांनी मनोगते व्यक्त केली. तसेच विद्यार्थ्यांमधून प्रणाली कामटे, गीतांजली डोंगरे, अमृता तेलोरे, परी चित्ते, प्रियंका सोळुंके, प्रतीक्षा टकले, अक्षरा म्हस्के यांनीही आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्षीय सूचना संजय दुधाडे यांनी केले. अनुमोदन अक्षय पुरनाळे यांनी दिले. सूत्रसंचालन प्रभाकर मराठे यांनी केले, तर आभार शितल दहिवाळकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

# कार्डियोलॉजिस्ट डॉ. अभिजित कोरडे प्रकरणी निष्पक्ष चौकशीची मागणी

## सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या बातम्यांचा निषेध । अकोले मेडिकल असोसिएशनचे तहसीलदारांना निवेदन

**अकोले । वीरभूमी–**

संगमनेर येथील कार्डियोलॉजिस्ट व अकोले तालुका मेडिकल असोसिएशनचे सदस्य डॉ. अभिजित कोरडे यांच्याबाबत सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या एकतर्फी, अपूर्ण व दिशाभूल करणाऱ्या बातम्यांची निष्पक्ष चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात सोमवारी सकाळी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी अकोलेचे तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सखाराम धनकुटे, सचिव डॉ. जयसिंग कानवडे, खजिनदार डॉ. रविंद्र सावंत यांच्यासह डॉ. संदीप कडलग, डॉ. रमा कुलकर्णी, डॉ. अनिल वाघ, डॉ. सचिन नवले, डॉ. सौ. नीरजा कुलकर्णी, डॉ. मारुती भांडकोळी, डॉ. शिवाजी वैद्य, डॉ. मच्छिंद्र मंडलिक, डॉ. मोहसीन शेख, डॉ. निलेश सहाणे, डॉ. तेजस शहा, डॉ. अमित काकड, डॉ. दर्शन बंगाल, डॉ. राहुल वाले, डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. अद्वैत देशपांडे, डॉ. मधुकर नवले, डॉ. आसिफ तांबोळी, डॉ. विराज शिंदे, डॉ. किरण कानवडे, डॉ. तुषार गावडे, डॉ. प्रतीक घोडके, डॉ. रवी डावरे, डॉ. संदेश भांगरे, डॉ. सागर कोल्हाळ, डॉ. किरण पारधी, डॉ. देवीदास नवले, डॉ. प्रविण सावळे, डॉ. संतोष तिकांडे, डॉ. वैभव काळे, डॉ. तृप्ती भांगरे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर येथील सोनांबेकर हॉस्पिटल प्रकरणात संबंधित रुग्ण दत्तात्रय दळवी यांना २८ फेब्रुवारी २०२५ रोजी हृदयविकाराच्या उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. डॉ. अभिजित कोरडे यांनी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत त्यांच्यावर अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी उपचार केले. अँजिओप्लास्टी यशस्वी झाली; मात्र त्यानंतर रुग्णाची किडनीची कार्यक्षमता कमी झाली. प्राथमिक उपचार सोनांबेकर हॉस्पिटलमध्ये करण्यात आले, परंतु पूर्णवेळ नेफ्रोलॉजिस्ट उपलब्ध नसल्याने रुग्णाला पुढील उपचारासाठी दुसऱ्या रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला. या संपूर्ण उपचारासाठी रुग्णाकडून कोणतेही शुल्क घेण्यात आले नव्हते.

यानंतर सुमारे तीन आठवड्यांनी दुसऱ्या रुग्णालयात डायलिसिसदरम्यान रुग्णाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणात कोणताही हलगर्जीपणा झाला आहे की नाही, याबाबतचा अंतिम अहवाल सिव्हिल सर्जन, अहिल्यानगर यांच्याकडून येणे अपेक्षित आहे. सध्या न्यायालयाच्या आदेशानुसार केवळ ऋखठ नोंदवून चौकशी सुरू असून, कुठेही निष्काळजीपणा किंवा अंतिम निष्कर्ष नोंदवलेला नाही.

तरीही सोशल मीडियावर डॉक्टरांची बाजू न मांडता अतिरंजित व दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसारित केल्या जात असल्याचा निषेध असोसिएशनने व्यक्त केला आहे. पोलीस व



न्यायालयीन यंत्रणेवर पूर्ण विश्वास असल्याचे सांगत त्यांना निष्पक्ष चौकशी करू द्यावी, अशी भूमिका मांडण्यात आली.

मीडिया ट्रायलचे प्रकार वाढत असून त्यामुळे डॉक्टरांचे मनोधैर्य खच्ची होत आहे. रुग्ण व डॉक्टर यांच्यातील विश्वास व संवाद यावरही परिणाम होत असून अशा वातावरणात डॉक्टरांना काम करणे कठीण होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या एकतर्फी, अपूर्ण व दिशाभूल करणाऱ्या बातम्यांबाबत निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी अकोले तालुका मेडिकल असोसिएशनने निवेदनाद्वारे केली आहे.